# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 04.08.2016 (का.प.क्र.-04) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक 04 ऑगस्ट 2016 (का.प.क्र.04) रोजी मा.सभापती श्री.मोहन मेघावाले यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वाजता सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.रमेश पवार, अति.आयुक्त, नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| 2. | स.स.श्री.नितीन रमन चित्ते |
| 3. | स.स.श्री.सिताराम इसराम सुरे |
| 4. | स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे |
| 5. | स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| 6. | स.स.श्री.विकास प्रकाश एडके |
| 7. | स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| 8. | स.स.श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड |
| 9. | स.स.श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| 10. | स.स.श्री.अजीम अहेमद रफिक |
| 11. | स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| 12. | स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| 13. | स.स.श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंडे |
| 14. | स.स.श्री.सोहेल शकील शेख |

**विषय क्र. 09 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला जाफरगेट आठवडी बाजारसाठी कार्यालयीन जा.क्र.मनपा/मामअ/2016/1393 दि.21/04/2016 अन्वये वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन निविदा मागविण्यात आल्या असता सदर आठवडी बाजाराच्या एकुण-9 निविदा विक्री करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी एकुण 8 निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदा उपआयुक्त (मालमत्ता), लेखाधिकारी व मालमत्ता अधिकारी यांचे समक्ष दि.31/05/2016 रोजी उघडण्यात आल्या त्याचे दर खालीलप्रमाणे-

**जाफरगेट आठवडी बाजार -**

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | प्रति बाजार प्राप्त निविदा दर रक्कम रूपये |
|---|---|---|
| 01. | श्री.खान मोहम्मद मुजाहेद | 38,313/- |
| 02. | श्री.शेख राजु शेख वहाब | 27,999/- |
| 03. | श्री.सय्यद खालेद अब्दुल रज्जाक | 26,651/- |
| 04. | श्रीमती कांबळे चंद्रकलाबाई राजु | 23,700/- |
| 05. | श्री.डुलगज मनोज किसन | 23610/- |
| 06. | श्री.कंडेरा योगेश जगदिश | 21,699/- |

| | | |
|---|---|---|
| 07. | श्री.सय्यद वसीम हिमायत जयदी | निविदा लिफाफा 1 व 2 नमुद नाही. बोध होत नाही. |
| 08. | श्री.उध्दव मुळे | निविदा लिफाफा 1 मध्ये Price Bid फॉर्म निघाला निविदा उघडली नाही. |

उपरोक्त सदर आठवडी बाजार करीता एकुण 8 निविदा प्राप्त झालेल्या असुन तुलनात्मक दरांचा तक्ता पाहता सर्वात जास्त दराची निविदा र.रू.38,313/- प्रती बाजार असुन निविदा श्री.खान मोहम्मद मुजाहेद यांची आहे.

करीता त्यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. मान्यता झाल्यास संबंधीताकडून करारनामा करून घेऊन कार्यादेश देण्यांत येईल.

श्री.कैलास गायकवाड : जाफरगेट आठवडीबाजार संदर्भातील आहे, यामध्ये न्यायालयामध्ये रिट याचिका दाखल आहे, आठवडी बाजार महानगरपालिकेची मालकी संदर्भांत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

विधी सल्लागार :जाफरगेट आठवडी बाजार संदर्भात दोन याचिका दाखल झाल्या आहेत, एक जनहित याचिका यामध्ये मा.न्यायालयाची prohibitory order झालेले नाही.

श्री.कैलास गायकवाड : जागाच आपल्या ताब्यात नाही, तर आपण त्याचे टेंडर कसे करतो, कायदेशीर बाबी तपासुन हा विषय परत आणावा.

प्र.सहा.संचालक (श्री.देशमुख):जागेचा ताबा आपला आहे, पूर्वापार बाजार चालत आला आहे. पीआर कार्डवर नांव लावणेबाबत कार्यवाही चालू आहे.

श्री.नितीन चित्ते :पीआर कार्डवर 4 जणांचे नांवे आहे. अशा परिस्थितीत आठवडी बाजार भरवतो, हे कुठे तरी थांबायला पाहीजे, महानगरपालिकेस त्या माध्यमातुन उत्पन्न मिळते, पीआर कार्डवर दुस-याचे नांव असतांना आपण आठवडी बाजार भरवतो कसा, खुलासा करण्यात यावा.

मालमत्ता अधिकारी (श्री.देखमुख): आठवडी बाजार पुर्वापार पासून त्या ठिकाणी भरत आहे.

मा.सभापती :पूर्वी पासून बाजार भरतो, सर्व सुविधा त्या ठिकाणी चालू आहे, पुर्वीपासून ज्या नियमानुसार देत आहोत त्या नियमानुसार हा विषय मंजूर करण्यात येतो,

श्री.अजीम अहेमद :टेंडरचा कालावधी काय आहे. वसुली कोणी केली आहे.

मालमत्ता अधिकारी (श्री.देशमुख):22.05.2016 रोजी टेंडर संपलेले आहे, महानगरपालिकेचे कर्मचा-यांमार्फत वसुली केली जाते.

प्र.स.संचालक (श्री.देशमुख) : एक वर्षाचे टेंडर आहे पूर्ण रेकॉर्ड उपलब्ध आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :पझेशन मध्ये आहे पण महानगरपालिकेच्या मालकीच्या नाही अशा किती मालमत्ता आहे, खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :पुढील सभेमध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्ता व मनपाच्या ताब्यातील परंतु मालकीहक्क नसलेल्या मालमत्ता बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी, महापालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे, सदरील विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला जाफरगेट आठवडी बाजारसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त दराचे निविदाधारक श्री.खान मोहम्मद मुजाहेद यांची र.रू.38,313/- प्रती बाजार प्रमाणेची निविदा सर्वानुमते मंजुर करण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 10 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला चिकलठाणा आठवडी बाजारसाठी कार्यालयीन जा.क्र.मनपा/मामअ/2016/1393 दि.21/04/2016 अन्वये वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन निविदा मागविण्यात आल्या असता सदर आठवडी बाजाराच्या एकुण-7 निविदा विक्री करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी एकुण 6 निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदा उपआयुक्त (मालमत्ता), लेखाधिकारी व मालमत्ता अधिकारी यांचे समक्ष दि.31/05/2016 रोजी उघडण्यात आल्या त्याचे दर खालीलप्रमाणे-

**चिकलठाणा आठवडी बाजार -**

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | प्रति बाजार प्राप्त निविदा दर रक्कम रूपये |
|---|---|---|
| 01. | श्री.कांबळे संतोष राजु | 17,117/- |
| 02. | श्री.गिरधारे राहुल राजु | 8,511/- |
| 03. | श्री.जाटवे सुभाष लक्ष्मण | 6,551/- |
| 04. | भारतमाता सेवाभावी शिक्षण संस्था | लिफाफा क्र.1 मध्ये ई.एम.डी. पावती नसल्यामुळे निविदा उघडण्यात आली नाही. |
| 05. | निनावी | मोठ्या लिफाफ्यावर फक्त चिकलठाणा आठवडी बाजार असा उल्लेख आहे. लिफाफा क्र.01 व 02 असे नंबर नाहीत. त्यामुळे बोध होत नाही. त्यामुळे निविदा उघडण्यात आली नाही. |
| 06. | श्री.संतोष जगताप | निविदा लिफाफा 1 मध्ये Price Bid फॉर्म निघाला निविदा उघडली नाही. |

उपरोक्त सदर आठवडी बाजार करीता एकुण 6 निविदा प्राप्त झालेल्या असुन तुलनात्मक दरांचा तक्ता पाहता सर्वात जास्त दराची निविदा र.रू.17,117/- प्रती बाजार असुन निविदा श्री.कांबळे संतोष राजु यांची आहे.

करीता त्यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. मान्यता झाल्यास संबंधीताकडून करारनामा करून घेऊन कार्यादेश देण्यांत येईल.

मा.सभापती : विषय क्र.10 ते 13 मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला चिकलठाणा आठवडी बाजारसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त दराचे निविदाधारक श्री.कांबळे संतोष राजु यांची र.रू.17,117/- प्रती बाजार प्रमाणेची निविदा सर्वानुमते मंजुर करण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 11 :</u>**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला पैठणगेट वाहतुक बेट वाहनतळासाठी कार्यालयीन जा.क्र.मनपा/मामअ/2016/1392 दि.21/04/2016 अन्वये वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन निविदा मागविण्यात आल्या असता सदर वाहनतळाच्या एकुण-8 निविदा विक्री करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी एकुण 7 निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदा उपआयुक्त (मालमत्ता), लेखाधिकारी व मालमत्ता अधिकारी यांचे समक्ष दि.31/05/2016 रोजी उघडण्यात आल्या त्याचे दर खालीलप्रमाणे-

**पैठणगेट वाहतुक बेट वाहनतळ -**

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | प्रतिमाह प्राप्त निविदा दर रक्कम रूपये |
|---|---|---|
| 01. | श्री.खान तन्वीर अब्दुल लतीफ खान | 32,100/- |
| 02. | श्री.जाटवे सुभाष लक्ष्मण | 31,117/- |
| 03. | श्री.खान युनुस सलीम | 28,786/- |
| 04. | श्री.आजम खान रहीम खान | निविदा लिफाफा 1 मध्ये Price Bid फॉर्म निघाला निविदा उघडली नाही. |
| 05. | श्री.परवेज खान फईम खान | लिफाफा 01 व 02 असे नंबर नाहीत. त्यामुळे बोध होत नाही. त्यामुळे निविदा उघडण्यात आली नाही. |
| 06. | श्री.विनोद सुभाष बेदमुथा | निविदा लिफाफा 1 मध्ये Price Bid फॉर्म निघाला निविदा उघडली नाही. |
| 07. | श्री.उध्दव मुळे | लिफाफा क्र.01 उघडला असता फक्त आधार कार्ड निघाले. त्यामुळे निविदा उघडली नाही. |

उपरोक्त सदर वाहनतळा करीता एकुण 7 निविदा प्राप्त झालेल्या असुन तुलनात्मक दरांचा तक्ता पाहता सर्वात जास्त दराची निविदा र.रू.32,100/-प्रतीमाह असुन निविदा श्री.खान तन्वीर अब्दुल लतीफ खान यांची आहे.

करीता त्यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. मान्यता झाल्यास संबंधीताकडून करारनामा करून घेऊन कार्यादेश देण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला पैठणगेट वाहतुक बेट वाहनतळासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त दराचे निविदाधारक श्री.खान तन्वीर अब्दुल लतीफ खान यांची र.रू.32,100/-प्रतीमाह प्रमाणेची निविदा सर्वानुमते मंजुर करण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 12 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ग्रीन सिटी, निसर्ग कॉलनी अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.49,97,692/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन 2012-13 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करण्यात येणार आहे.

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.34, दिनांक 24/07/2015 अन्वये या कामाचा प्रस्ताव नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत अनुदान प्राप्त होणे करीता पाठविणेस मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरील प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात आला होता.

मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे पत्र प्र.मा.क्र-2016/नपाप्र/नागरी दलित वस्ती/मनपा/प्र.मा./कावी/ 357, दिनांक 13/04/2016 अन्वये या कामाकरीता रक्कम रू.49,97,692/- इतके अनुदान मंजुर झालेले आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.49,97,692/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ग्रीन सिटी, निसर्ग कॉलनी अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.49,97,692/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 13 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मौजे आप्पावाडी, मिटमिटा येथील श्री.कांतेश्वर विश्वंभर आप्पा लिंभारे यांच्या मालकीची इमारत नव्याने सुरू करण्यात आलेल्या बालवाडीसाठी दि.10/08/2015 पासून भाडे तत्वावर घेण्यात आलेली आहे. त्याचे क्षेत्रफळ 15.84 चौ.मी. एवढे असून आर.सी.सी. बांधकाम आहे. सदर इमारतीसाठी सन 2016 च्या सिध्द शिघ्र गणकानुसार प्रतीमाह रू.1307/- एवढे भाडे येते.

सिध्द शिघ्र गणकानुसार सदरील जागेचे रू.1307/- एवढे मासिक भाडे असून सदरील भाड्यास मा.स्थायी समितीची मान्यता होणे आवश्यक आहे. करिता वरिल प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे आप्पावाडी, मिटमिटा येथे नव्याने सुरू करण्यांत आलेल्या बालवाडीसाठी भाडेतत्वावर घेतलेल्या श्री.कांतेश्वर विश्वंभर आप्पा लिंभारे यांच्या मालकीची आर.सी.सी. बांधकाम असलेली इमारत क्षेत्रफळ 15.84 चौ.मी. प्रतीमाह रू.1307/- प्रमाणे मासीक भाड्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 14 :**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिका, सीआरटी, सी आय आय आणि बजाज यांच्या सामंजस्य कराराने एकूण सध्या 115 निवडणूक प्रभागांपैकी 36 निवडणूक प्रभागांमध्ये ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे गोळा करण्यात येऊन ओला कचरा वॉर्ड अंतर्गतच डंप करण्यात येऊन कंपोस्ट खत तयार करण्यात येत आहे. आणि सुका कचरा हा वेचकांमार्फत पुनर्प्रक्रिया करण्यासाठी जकात नाका येथे उभारण्यात आलेल्या सॉर्टिंग शेडला पाठविण्यात येतो. यामुळे नारेगांव ट्रेंचिंग ग्राऊंड येथे जाणाऱ्या कचऱ्याच्या वाहनांच्या फेऱ्या कमी झालेल्या आहेत. टप्प्याटप्प्याने ही योजना सर्व निवडणूक प्रभागांमध्ये राबविण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक वॉर्डात सॉर्टिंगशेड आणि कंपोस्टींगकरीता संरक्षणासाठी वायर फेन्सींगची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत हिमायतबाग आणि सेंट्रल नाका या दोनच ठिकाणी सॉर्टिंग शेड उभारण्यात आलेले आहेत. मान्सुनकाळ असल्यामुळे लवकरात लवकर कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी प्रत्येक वॉर्डात खालीलप्रमाणे सॉर्टिंग शेड तयार करण्यासाठी जागा निश्चित होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | वॉर्डाचे नांव | सॉर्टिंग शेडची जागा |
|---|---|---|
| 01. | वॉर्ड कार्यालय अ | स्मृतीवन गार्डन |
| 02. | वॉर्ड कार्यालय ब | 1. सिपेट कंपनी मैदानाजवळ<br>2. मार्केट कमिटी जवळ (जाधववाडी)<br>3. मजनू हिल गार्डन |
| 03. | वॉर्ड कार्यालय क | 1. मौलाना आझाद रिसर्च सेंटर<br>2. सेंट्रल नाका |
| 04. | वॉर्ड कार्यालय ड | 1. |
| 05. | वॉर्ड कार्यालय ई | 1. विठ्ठलनगर (जैन मंदिराच्या मागे) |
| 06. | वॉर्ड कार्यालय फ | 1. अग्निहोत्री चौकाच्या बाजूला (विश्वभारती कॉलनी) |
| 07. | सातारा-देवळाई परिसर | 2. एस.आर.पी. कॅम्प |

करिता, वॉर्डनिहाय सॉर्टिंग शेड उभारण्यासाठी उपरोक्त प्रमाणे जागांची निश्चिती करण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव सविनय सादर.

श्रीमती शेख समीना :शेड बांधण्याचा खर्च कोण उभारणार संस्था किंवा महानगरपालिका उभारणार खुलासा करण्यात यावा.

श्री.राजगौरव वानखेडे : घनकचरा कक्ष प्रमुख श्री.शिवाजी झनझन सभागृहात उपस्थित नाही, गैरहजर राहण्याबाबत पत्र दिले आहे का? ओला व सुका कचरा वेगळा करावा लागणार आहे. विषयाचे गांभिर्य त्यांना नाही, नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

श्रीमती शेख समीना :विषयाला स्थगीती देण्यात यावी, कराराबाबत काहीच माहीती नाही.

मा.सभापती : नगर सचिव खुलासा करण्यात यावा.

श्रीमती शेख समीना :शास्ती लावण्यात यावी.

नगर सचिव :नियमानुसार प्रशासकीय कारवाई करता येते.

मा.आयुक्त :कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल. मनपा सीआरटी, सीआयआय आणि बजाज यांच्या सामंजस्य कराराने ओला व सुका कचरासाठी प्रत्येक वॉर्डात सॉर्टिंगशेड उभारण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सदर जागेबाबत स.सदस्यांना विचारणा करण्यात आलेली आहे का? काही ठिकाणी यास विरोध होत आहे.

श्रीमती शेख समीना :माझ्या वार्डात यास विरोध आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.

श्रीमती शेख समीना :विषयास स्थगीती देण्यात यावी.

मा.सभापती :विषय क्र.14 स्थगीत ठेवण्यात येतो, पुढील बैठकीत सविस्तर माहीतीसह विषय ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.15 :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत एकूण 137 बालवाड्या शहरातील विविध भागात चालविल्या जातात. सर्व बालवाडी वर्गाचे एकूण 3380 विद्यार्थी आहेत, हे विद्यार्थी साधारणपणे कमी उत्पन्न गटातील पालकांचे असतात. यांचा वयोगट 3 ते 6 वर्षे असतो. ह्या वयोगटातील मुलांच्या शारिरीक व बौध्दीक विकासासाठी सकस आहारांची अत्यंत आवश्यकता असते. तो त्यांना न मिळाल्यास ह्या वयात कुपोषण होऊन त्यांचा शारिरीक व बौध्दीक विकास खुंटला जातो. त्यानंतरच्या वयात तो भरुन निघणे अवघड असते. याबाबीचा विचार करुन महानगरपालिकेतील बालवाडीतील मुलांना "पोषण आहार" चालु करणे गरजेचे वाटते.

1 ली ते 7 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शासनाच्या शालेय पोषण आहार योजनेचा फायदा मिळतो पण बालवाडीसाठी सध्यातरी कुठलीही योजना नाही. काही मनपाच्या शालेय इमारतीत बालवाडीचे वर्ग चालतात तेथील बालवाडीच्या विद्यार्थ्यांना शाळेतील अनुपस्थित विद्यार्थ्यांचा उरलेला आहार दिला जातो, तो नेहमी पुरेसा नसतो. ज्या बालवाड्यात शालेय इमारतीच्या बाहेर म्हणजे विविध स्लम भागात आहे. त्यांना कुठलाही पोषण आहार मिळत नाही. अशा प्रकारे पोषण आहार तफावत आहे ती तशी न राहता सर्वांना पुरेसा व त्यांच्या हक्काचा आहार मिळाला पाहीजे यासाठी महानगरपालिकेच्या 1 ली ते 7 वी पर्यंच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार हा इस्कॉन फुड रिलिफ फाऊंडेशन, मुंबई यांच्यामार्फत देण्यात येतो. तो अत्यंत चांगला, स्वच्छ व गरम असा असतो. याच धर्तीवर इस्कॉन फुड रिलिफ फाऊंडेशनाचा पोषण आहार बालवाड्यांसाठी मागील दोन वर्षापासून देण्यात येत आहे. पोषण आहाराचा दर्जा चांगला असल्याकारणाने सन 2016-17 या शैक्षणिक वर्षासाठी पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी इस्कॉन फूड रिलीफ फाउन्डेशन या संस्थेस मुदतवाढ देण्यासंबंधी प्रस्तावित करण्यात येत आहे.

बालवाडी पोषण आहारास लागणारे साहित्य (तांदुळ, दाळ, भाज्या, तुप, मसाला, इत्यादी.) उपलब्ध करुन घेणे, तो शिजवणे, तो बालवाडीपर्यंत पोहचवणे अशी संपूर्ण जबाबदारी ही इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशनची असेल. ह्या संपूर्ण जबाबदारीसाठी महानगरपालिकेने रू.6.20 पै./- प्रति दिन/प्रति लाभार्थी असे दर ठरविले आहेत.

त्याप्रमाणे 3380 विद्यार्थी x रु.6.20 = **रू.20,956/-** प्रति दिन यानुसार एकूण वर्षभरात अंदाजे 220 कार्य दिवस (सुटयांचे दिवस वगळता) पोषण आहार द्यावा लागतो. म्हणजेच 220 x 20,956 = **रू.46,10,320/-** एवढा अंदाजित खर्च संपूर्ण वर्षासाठी येईल.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 66(1)(3) मध्ये महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार तरतूद करता येईल, अशा बाबीमध्ये शाळकरी मुलांसाठी दुधाची तरतुद करणे याबाबीचा समावेश आहे.**

बालवाड्यांतील विद्यार्थ्यांचा वयोगट 3 ते 6 वर्ष असा आहे, त्यांना जरुरी उष्मांक मिळण्यासाठी पुरक आहाराची गरज आहे. त्यामुळे दुधा ऐवजी मनपा बालवाडीच्या विद्यार्थ्यांना पोषण आहार देणे बाबत. **मा.सर्वसाधारण सभा दि.18/10/2012 ठराव क्र. 906 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे**. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 संविदा प्रकरण 5 चे 2/(2) नुसार सन-2016-17 या शैक्षणिक वर्षासाठी बालवाडी पोषणआहार योजनेस लागणारा एकुण खर्च रु.46,10,320/-(अंदाजित)खर्चाच्या मान्यतेस्तव सादर. तसेच सदर पोषण आहार हा इस्कॉन फूड फाऊंडेशन या संस्थेमार्फत पुरविणेच्या मान्यतेस्तव सादर.

श्री.राजगौरव वानखेडे :विनापरवानगी गैरहजर राहणा-या अधिका-यांबाबत काय कार्यवाही करणार.
मा.सभापती :संबधीत अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस आजच देण्यात यावी.
मा.सभापती :विषय क्रमांक 15 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत एकूण 137 बालवाड्या शहरातील विविध भागात चालविल्या जात असून सर्व बालवाडी वर्गातील एकूण 3380 विद्यार्थी हे कमी उत्पन्न गटातील पालकांचे असून त्यांचा यांचा वयोगट 3 ते 6 वर्षे असल्यामुळे, महानगरपालिकेतील बालवाडीतील मुलांना "पोषण आहार" उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यांत येते. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 संविदा प्रकरण 5 चे 2/(2) नुसार सन 2016-17 या शैक्षणिक वर्षासाठी बालवाडी पोषण आहार योजनेस लागणारा एकुण र.रु.46,10,320/- (अंदाजित) खर्चास तसेच सदर पोषण आहार हा इस्कॉन फूड फाऊंडेशन या संस्थेमार्फत पुरविणेसाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र.16 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एन 09, एम-2 ज्ञानेश्वरनगर सिडको मधील उद्यान विकसीत करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,98,449/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची 2013-14 नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित 2016-17 नविन उद्याने या अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,98,449/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : ऐनवेळचे सर्व विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन 09, एम-2 ज्ञानेश्वरनगर सिडको मधील उद्यान विकसीत करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,98,449/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.17 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जालना रोड येथील नभुक्र.12878/1/2, निशा प्राईड इमारतीमधील 75-25 अन्वये महानगरपालिकेस मिळालेल्या 25% बांधकामापैकी हॉल ज्याचे क्षेत्रफळ सर्वसाधारण पार्कींग व महानगरपालिका हॉलसह असे एकत्रित क्षेत्रफळ 880.49 चौ.मी. एवढे आहे. सदर जागा शहर वाहतुक शाखा, पोलीस कार्यालय यांच्या कार्यालया करीता इमारत भाडेतत्वावर देणेसाठी मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कार्यालयाकडून जा.क्र.आरेखक/भाडे-5640, दि.11/07/2016 अन्वये सदर इमारतीसाठी प्रतीमाह रू.38,930/- प्रमाणे वाजवी भाडे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्याअनुषंगाने सदर इमारत शहर वाहतुक शाखा पोलीस आयुक्त कार्यालय यांच्या कार्यालयास देणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा स्वाक्षरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोड येथील नभुक्र.12878/1/2, निशा प्राईड इमारतीमधील 75-25 अन्वये महानगरपालिकेस मिळालेल्या 25% बांधकामापैकी हॉल ज्याचे क्षेत्रफळ सर्वसाधारण पार्कींग व महानगरपालिका हॉलसह असे एकत्रित क्षेत्रफळ 880.49 चौ.मी. जागा शहर वाहतुक शाखा, पोलीस कार्यालया करीता इमारत भाडेतत्वावर देणेसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे

कार्यालयाकडून जा.क्र.आरेखक/भाडे-5640, दि.11/07/2016 अन्वये सदर इमारतीसाठी प्रतीमाह रू.38,930/- प्रमाणे वाजवी भाडे प्रमाणपत्र देण्यात आले असल्यामुळे, सदर इमारत शहर वाहतुक शाखा पोलीस आयुक्त कार्यालय यांच्या कार्यालयास र.रू.38,930/- प्रतीमाह प्रमाणे भाडेतत्वावर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.18 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.03 एकतानगर, राधास्वामी कॉलनी येथील कॉंक्रीटींग करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.34,99,411/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

त्यानुसार या कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चार कोरी निविदा दरपत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत चारही निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके उघडण्यात आली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 01. | मे.माणिक इन्फ्रा पोजेक्टस | 17.00% कमी दराने |
| 02. | मे.सिद्दीकी कन्स्ट्रक्शन | 15.05% कमी दराने |
| 03. | मे.पदमावती कन्स्ट्रक्शन | 12.99% कमी दराने |
| 04. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | 7.00% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकात तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.00% कमी दराचे मे.माणिक इन्फ्रा पोजेक्टस, कंत्राटदार यांची निविदा आहे.

तरी या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.34,99,411/- चे अंदाजपत्रक तसेच सदरील काम मे.माणिक इन्फ्रा पोजेक्टस कंत्राटदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17% कमी दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.03 एकतानगर, राधास्वामी कॉलनी येथील कॉंक्रीटींग करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17% कमी दराची मे.माणिक इन्फ्रा पोजेक्टस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.19 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एक वर्ष कालावधी करीता शहरातील विविध वार्डामध्ये कचरा संकलन करून वाहतुक करण्यासाठी ट्रॅक्टर/टिप्पर (407) भाडेतत्वावर घेण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.117 दिनांक 20/08/2015 नुसार रक्कम रूपये 99,13,176/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आलेली आहे. मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार या कामासाठी ई-टेंडरद्वारे निविदा प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या असता तिसरी वेळेस एकुण 04 निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा मध्ये तांत्रिकदृष्ट्या तीन निविदा परिपूर्ण असल्यामुळे त्यांची व्यापारी निविदा उघडण्यात आल्या असून निविदेतील दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | प्रतिदिन प्रति ट्रॅक्टर/ टिप्पर (407) भाडे |
|---|---|---|
| 01. | मे.पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल, औरंगाबाद | 1850/- |
| 02. | मे.ओंकारेश्वर सुशिक्षित बेरोजगार सेवा सह. संस्था, औरंगाबाद | 1925/- |
| 03. | मे.निलेश लेबर सप्लायर्स, औरंगाबाद | 2070/- |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदामध्ये सर्वात कमी दराची निविदा मे.पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल, औरंगाबाद यांची आहे. तथापी सदरील दर जास्तीचे असल्यामुळे दर कमी करणे बाबत वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटी अंती मे.पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल, औरंगाबाद यांनी दर कमी करून प्रतिदिन रूपये 1700/- प्रमाणे काम करण्यास संमती दिली आहे.

करीता वरीलप्रमाणे वाटाघाटीअंती कमी दराच्या निविदेस मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एक वर्ष कालावधी करीता शहरातील विविध वार्डामध्ये कचरा संकलन करून वाहतुक करण्यासाठी ट्रॅक्टर/टिप्पर (407) भाडेतत्वावर घेण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल, औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार प्रतिदिन रूपये 1700/- प्रमाणे त्यांचेकडून काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.20 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एक वर्ष कालावधी करीता शहरातील विविध वार्डामध्ये कचरा संकलनासाठी ॲटोरिक्षा (लोडींग) / हायड्रोलिक हॉपर्स भाडे तत्वावर घेण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.118 दिनांक 20/08/2015 नुसार रक्कम रूपये 1,61,30,400/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आलेली आहे. मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार या कामासाठी ई-टेंडरद्वारे निविदा प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या असता सहावी वेळेस एकुण 02 निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा मध्ये तांत्रिकदृष्ट्या दोन्हीही निविदा परिपूर्ण असल्यामुळे त्यांची व्यापारी निविदा उघडण्यात आली. प्राप्त निविदाधारक व त्यांनी भरलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **एजन्सीचे नाव** | **प्रतिदिन प्रति ॲटोरिक्षा (लोडींग) भाडे** | |
|---|---|---|---|
| | | **तीन चाकी** | **चार चाकी** |
| 01. | मे.ॲक्टीव मोटर्स, औरंगाबाद | 1195/- | 1350/- |
| 02. | मे.ओंकारेश्वर सुशिक्षित बेरोजगार सह. संस्था, औरंगाबाद | 1221/- | 1375/- |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदामध्ये सर्वात कमी दराची निविदा मे.ॲक्टीव मोटर्स, औरंगाबाद यांची आहे. तथापी सदरील दर जास्तीचे असल्यामुळे दर कमी करणे बाबत एजन्सी सोबत वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटी अंती मे.ॲक्टीव मोटर्स, औरंगाबाद यांनी दर कमी केले असून खालील दराप्रमाणे काम करण्यास संमती दिली आहे.

| **अ.क्र.** | **एजन्सीचे नाव** | **प्रतिदिन प्रति ॲटोरिक्षा (लोडींग) भाडे** | |
|---|---|---|---|
| | | **तीन चाकी** | **चार चाकी** |
| 01. | मे.ॲक्टीव मोटर्स, औरंगाबाद | 800/- | 900/- |

करीता वरील प्रमाणे वाटाघाटीअंती कमी दराच्या निविदेस मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एक वर्ष कालावधी करीता शहरातील विविध वार्डामध्ये कचरा संकलनासाठी ॲटोरिक्षा (लोडींग) / हायड्रोलिक हॉपर्स भाडे तत्वावर घेण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.ॲक्टीव मोटर्स, औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार खालीलप्रमाणे दरानुसार संबंधीत एजन्सीकडून ॲटोरिक्षा (लोडींग) / हायड्रोलिक हॉपर्स भाडे तत्वावर घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्रतिदिन प्रति ॲटोरिक्षा (लोडींग) भाडे | |
|---|---|---|---|
| | | तीन चाकी | चार चाकी |
| 01. | मे.ॲक्टीव मोटर्स, औरंगाबाद | 800/- | 900/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.21 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.8 सुरेवाडी येथील अंतर्गत मुख्य रस्ता नादुरूस्त/खराब झाला असून, या रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. सदरील रस्ता हा या वसाहती मधील वर्दळीचा रस्ता आहे. नागरीकांना रहदारीस खुप त्रास होत आहे. त्यामुळे या रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 49,82,011/- इतकी आहे. सदरील काम महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2016-17 अंतर्गत मा.स्थायी समितीने शिफारस केलेल्या नवीन कामांची यादी पान क्र.SCR Ward-B-P.No.13, लेखाशिर्ष नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग, अ.क्र.46- वॉर्ड क्र.8 जळगाव रोड ते प्रणव मेडीकल पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे रक्कम रूपये 20.00 लक्ष, पान क्र. SCR Ward-B-P.No.13, लेखाशिर्ष नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग, अ.क्र.47-वॉर्ड क्र.8 श्री.संजय चौधरी यांच्या घरापासून 36 मीटर डी.पी. रस्त्यापर्यंत कॉंक्रीटीकरण करणे-र.रू.10.00 लक्ष, पान क्र. SCR Ward-B-P.No.13, लेखाशिर्ष नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग, अ.क्र.49-वॉर्ड क्र.8 अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे- रक्कम रूपये 20.00 लक्ष अशा एकत्रित रक्कम रूपये 50.00 लक्ष तरतुदीतुन प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी दिनांक 01/08/2016 रोजी मान्यता प्रदान केली आहे. तरी वार्ड क्र.8, सुरेवाडी येथील अंतर्गत मुख्य रस्त्याचे ट्रिमिक्स सिमेंट कॉंक्रीट करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 49,82,011/ चा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.8, सुरेवाडी येथील अंतर्गत मुख्य रस्त्याचे ट्रिमिक्स सिमेंट कॉंक्रीट करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 49,82,011/ च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.22 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन 2016-2017 या एका आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांकरीता लागणारे बीफ खरेदीसाठी रूपये 57,09,120/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा दिनांक 18/06/2016 ठराव क्रमांक 471 अन्वये मान्यता प्रदान झालेली आहे.

सदरील अंदाजपत्रकासाठी ई-टेंडरद्वारा निविदा मागविण्यात आल्या असता एकुण चार निविदांची विक्री झाली. निविदा दाखल करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा प्राप्त झाल्या, परंतु एका निविदाधारकाने कागदपत्रांची पुर्तता न केल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या रद्द करण्यांत आली. उर्वरित तीन निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | दर प्रति किलो रूपये |
|---|---|---|
| 01. | अब्दुल अजीम अब्दुल रहीम | रू.160.00 |
| 02. | गफुरमियॉं कुरैशी | रू.162.00 |
| 03. | अब्दुल हमीद हनीफ कुरेशी | रू.166.50 |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदामध्ये सर्वात कमी दराची निविदा अब्दुल अजीम अब्दुल रहीम यांची रू.160.00 प्रती किलो प्रमाणे आहे.

प्राणी संग्रहालयात वाघ,पांढरे वाघ, बिबटे, कोल्हे, लांडगे, तरस, मगर व उदबिल्ले असे एकूण 22 मांसाहारी प्राणी असून केंद्रीय प्राणि संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार प्राण्यांकरीता बीफ खाद्य पुरवठ्यासाठी प्राप्त कमी दराने अंदाजे वार्षिक खर्च रू.57,09,120.00 अपेक्षित आहे.

तुलनात्मकदृष्ट्या दरानुसार प्राणी संग्रहालयातील मांसाहारी प्राण्यासाठी बीफ खरेदी करीता श्री.अब्दुल अजीम अब्दुल रहीम यांचे दर रू.160.00 प्रति किलो सन 2016-2017 (01/05/2016 ते 31/03/2016) या कालावधी करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2016-2017 या एका आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांकरीता लागणारे बीफ खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.अब्दुल अजीम अब्दुल रहीम यांची सन 2016-2017 (01/05/2016 ते 31/03/2016) या कालावधीकरीता प्रती किलो रू.160.00 दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 23 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.89 ज्योतीनगर येथील ज्योतीनगर रेखाकंनातील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2012-13 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.2990971/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

त्यानुसार या कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सहा कोरी निविदा दरपत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके उघडण्यात आली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 01. | श्री.के.बी.पाथ्रीकर | 9% कमी दराने |
| 02. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | 4.40% जास्त दराने |
| 03. | मे.अरोरा कन्स्ट्रक्शन | 6.12% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकात तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9% कमी दराची श्री.के.बी.पाथ्रीकर, कंत्राटदार यांची निविदा आहे.

तरी या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.29,90,971/- चे अंदाजपत्रक तसेच सदरील काम श्री.के.बी.पाथ्रीकर, कंत्राटदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9% कमी दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.89 ज्योतीनगर येथील ज्योतीनगर रेखाकंनातील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.29,90,971/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9% कमी दराची श्री.के.बी.पाथ्रीकर, कंत्राटदार यांच्या निविदेस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| श्री.रावसाहेब आमले | :ऐनवेळेचे विषयाची माहीती देण्यात यावी. |
| श्रीमती शेख समीना | :ऐनवेळच्या विषयाची माहीती देण्यात यावी. |
| श्रीमती मनिषा मुंडे | :माझ्या वार्डात एकही विकास काम होत नाही निवडून येऊन आता दिड वर्ष झालेले आहे. पाणीपूरवठा, ड्रेनेज, रस्ते यांचे कामे होत नाही, सभेमध्ये कशासाठी यायचे ? |
| श्री.राजगौरव वानखेडे | :मा.स्थायी समितीचे अधिकार बाबत माहिती देण्यात यावी. |
| मा.सभापती | :माहीती देण्यात यावी. |

नगर सचिव :मा.स्थायी समिती सभेचे अधिकार सभागृहास वाचून दाखविण्यात येतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, लेख्यांची छाननी व लेखापरीक्षा नियम 105 व 106 बाबत माहीती देण्यात येते.

श्री.राजगौरव वानखेडे :किती वर्षापासून अहवाल सादर केलेला नाही, खुलासा करण्यात यावा.

मुख्यलेखापरिक्षक :महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 105 व 106 नुसार लेख्यांची छाननी व लेखापरीक्षकाने अहवाल सादर करण्यासंदर्भातील आहे. लेखे अप्राप्त आहे लेखे प्राप्त झाल्यास अहवाल सादर करण्यात येईल. प्रत्येक महिन्यात लेखा विभागास लेख्यांची मागणी केलेली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :मा.आयुक्त यांनी खुलसा करावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :लेखा विभागाने ताबडतोब लेखे लेखापरिक्षण विभागास देणे अपेक्षीत आहे.

श्रीमती शेख समीना :लेखा विभागाकडुन खुलासा घेण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी :जे लेखे ठेवण्याची पध्दती ही द्वीनोंद पध्दतीत आहे. सन 2013 पुर्वीचे लेखे साफट कॉपीमध्ये आहे. लेखे पुरविण्याबाबत कार्यवाही केली जाईल.

श्री.राजगौरव वानखेडे :साप्ताहिक लेखे पुरविण्याचे नियम आहे.

श्री.सिताराम सुरे :50 हजारांच्या संचिका मंजूर होत नाही. जाधव मंडप डोकेरेटरला किती बील अदा करण्यात आले, एवढी तातडी कशासाठी होती. स्थायी समितीची परवानगी घेतली का?

श्री.राजगौरव वानखेडे :यापुर्वीच्या मुख्य लेखाअधिकारी यांनी स्थायी समितीला माहिती देणे आवश्यक होते.

मुख्यलेखाधिकारी :लेखे देणे बाबतची कार्यवाही तातडीने करण्यात येईल.

श्रीमती मनिषा मुंडे :माझ्या वार्डात रस्त्यावर खड्डे खड्डे पडलेले आहे, मुरूम टाकण्याचे काम करण्यात येत नाही.

नगर सचिव :स्थायी समितीचे अधिकार वाचून दाखविण्यात येते.

श्री.कैलास गायकवाड :मुरूम त्वरीत टाकण्यात यावा. रस्त्यावर अनेक खड्डे पडलेले आहे. मा.आयुक्तांनी मुरूम टाकण्यासंदर्भात कार्यकारी अभियंता यांना निर्देश दिलेले आहेत.

श्री.गजानन मनगटे :स्थायी समितीने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होणे महत्वाचे आहे. मा.अतिरिक्त आयुक्त यांना सभागृहात बसण्याची परवानगी तत्कालिन आयुक्त यांनी दिलेली आहे.

(प्रत्येक वार्ड निहाय रस्त्यांवरील खड्डयांवरती मुरूम टाकण्यासंदर्भात वार्ड अभियंता यांच्याकडुन खुलासा घेण्यात आला, अंदाजपत्रक तयार करून मंजूरी अंर्तगत पाठविण्यात आलेले असल्याचे तसेच टेंडर मंजूरी अंतर्गत असल्याबाबत माहीती सभागृहास देण्यात आली.)

श्री.कैलास गायकवाड :ज्या वार्डामध्ये मुरूमाची जास्त आवश्यकता आहे, त्या प्रमाणेच अंदाजपत्रक तयार करायला पाहीजे होती.

श्री.नितीन चित्ते :ट्रि गार्ड व मुरूम हे दोन्ही विषय अत्यंत महत्वाचे आहे, सहा लाखाच्या स्वेच्छा निधी दिला आहे, त्याचे टेंडर झाले पाहीजे, स्वेच्छानिधीचा अधिकार त्या त्या वार्डाच्या रस्त्याला देण्यात यावेत. पुर्वीच्या सिस्टीमनुसार स्वेच्छानिधीचा अधिकार देण्यात यावा.

श्री.राजगौरव वानखेडे :स्वेच्छानिधीचा अधिकार नगरसेवकांना देण्यात यावा. प्रशासनाने स्थळ पाहणी करून काम झाले आहे की, नाही हे पाहण्यात यावे. शॉर्ट टेंडर काढण्यात यावे.

मा.सभापती :सर्वच स.सदस्यांनी पोटतिडकीने हा विषय मांडलेला आहे. मुरूमाचा गंभीर विषय आहे. 67 (3) नुसार मुरूम कसा टाकता येईल. शहर अभियता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता :गुंठेवारी भागामध्ये चिखल इत्यादि संदर्भात चर्चा सुरू आहे, मी या संदर्भात कार्यकारी अभियंता यांचेसोबत रिव्हयु घेतला आहे. पावसाळयामध्ये डांबरीकरण करता येणार नाही. एक नविन प्रयोग मध्यंतरी केला परंतु तो सक्सेस झालेला नाही. गुंठेवारी भागात प्रथम रस्ते करावे लागणार आहे, दोन्ही बाजूला घरे झालेली आहे, पाणी काढायला जागा नाही. मिनीमम 7 दिवसांचा अवधी असतो, 67(3) हा मा.आयुक्तांचा अधिकार आहे, गुंठेवारी हा अनाधिकृत भाग असतो, तेथे काम करण्यास अडचणी आहेत. या बाबत वरीष्ठ पातळीवर निर्णय घेणे आवश्यक आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :शॉर्टटेंडरला वेळ लागणार आहे, नगरसेवकांच्या स्वेच्छानिधी बाबत मा.आयुक्तांशी चर्चा करणे आवश्यक आहे, गुंठेवारी भागात वाईट परिस्थिती आहे.

श्री.गजानन मनगटे :मा.आयुक्त यांचेशी प्रत्यक्ष भेटुन सदरील विषयाबाबत चर्चा करू.

(याच वेळी काही निर्णयच होत नाही, असे म्हणत श्री.गजानन मनगटे सभागृहातुन निघुन जातात.)

श्री.राजगौरव वानखेडे :38 शिक्षकांच्या बदल्या झालेल्या आहेत, खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :LAQ संदर्भात उपआयुक्त (शिक्षण) नागपुरला गेलेले आहेत.

श्रीमती संगीता वाघुले अनाधिकृत टॉवर बाबत संबधीत अधिकारी यांना वारंवार सांगण्यात आले होते, कारवाई करण्यात बाबत परंतु कोणतील कारवाई केलेली नाही. सदरील टॉवरला आग लागलेली आहे, त्यास कोण जबाबदार आहे. याचे उत्तर कोण देणार श्री.निकम आज उपस्थित नाही, जबाबदारी कुणीची आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या. स्थायी समितीस का कळविले नाही? श्रीमती देशमुख मिसारवाडी येथुन विश्रांती नगर येथे बदली झाली. तसेच श्रीमती सविता शिरसाठे यांची विश्रांतीनगर येथुन मिसारवाडी येथे बदली झाली. परंतु हे वर्षानुवर्ष विश्रांतीनगर येथेच कार्यरत आहेत. Advance दोन महिन्यांच्या स्वाक्षरी करण्यात आल्यामुळे त्यांची बदली करण्यात आली. अधिकारी यांना पैसे देवुन परत त्या विश्रांतीनगर येथे गेल्या. तात्काळ या दोन बदल्या रद्द करण्यात आल्या.

मा.सभापती :आयुक्त आपण काय कार्यवाही करणार? (शिरसाठे व देशमुख) शिक्षणाधिकारी यांच्यावर किती दिवसात कार्यवाही करण्यात येईल?

मा.आयुक्त :सदरील प्रकरणी एका महिन्यात चौकशी करून दोषींवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

श्री.राजगौरव वानखेडे :अतिक्रमण विभाग हा पैसे कमविण्याच्या विभाग झाला आहे.

श्री.सिताराम सुरे :अनाधिकृत टॉवर बांधकाम मोठया प्रमाणात शहरात आहे. काहीच कार्यवाही करण्यात येत नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :अतिक्रमण संदर्भात चर्चा चालू आहे. अतिक्रमण विभाग पैसे कमविण्याचा विभाग झालेला आहे, एरिया वाईझ एजंट ठरलेला आहे. अतिक्रमण विभागातील अधिकारी त्या ठिकाणी जावुन संबधीत ठिकाणी कार्यवाही करण्यात येते, संबधीताशी मॅनेज

करून सोडुन देण्यात येते, अर्जदार राहूल इंगळे ( यांचे पत्र सभागृहास वाचवून दाखवतात) वर्षोनुवर्ष श्री.जमशेद अतिक्रमण विभागातच आहे त्यांची का बदली करण्यात येत नाही? बदली झालेले कर्मचारी परत 2/3 महिन्यात त्याच जागी परत येतात. दलाल अतिक्रमण विभागाने तयार करून ठेवले आहेत. आयुक्तांनी राहूल इंगळे यांच्यावर गुन्हा दाखल करणे बाबत आदेशीत केल्यामुळे आजपर्यंत गुन्हा का दाखल केला नाही?

प्रशासकीय अधिकारी (श्री.महाविर पाटणी) :एन-3 15 व 16 च्या प्लॉट बाबत पार्कींग रस्त्यावर होणेबाबत तक्रार प्राप्त झाली होती. यासंबधी मालकी हक्काची नोटीस दिली परंतु त्यांचा खुलास प्राप्त झालेला नाही, सिडको कडुन अधिक माहीती घेण्यात येत आहे. श्री.राहुल इंगळे यांचेवर गुन्हा दाखल करण्याबाबत कारवाई चालू आहे.

श्री.सुरे सिताराम :कायद्यानुसार सर्व पाहणी माहीती घेण्यात यावी.

प्रशासकीय अधिकारी :सिडको कार्यालयाकडुन माहीती मागविण्यात आली आहे,त्यांच्या माहीतीवरच पुढील कार्यवाही अवलंबून आहे.यासंबधी सिडको कार्यालयाशी फॉलोअप चालू आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :श्री.पाटणी हे सक्षम अधिकारी नाहीत. त्यांच्या चार्ज काढून घ्यावा. अतिक्रमण विभागात किती बीआय आहेत.

प्रशासकीय अधिकारी :10 बी.आय. आहेत.

श्री.सुरे सिताराम :गुलमंडी भागात सुध्दा मोबाईल शॉप टाकून अतिक्रमण करण्यात आले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :गट क्र.20 फरशीचे दुकान

श्रीमती मनिषा मुंढे :42 घरात पाणी शिरले. रात्री 1.30 वाजता खुप पाऊस आला.

मा.सभापती :आताच अतिक्रमण विभागाबाबत पोड तिडकीने चर्चा केलेली आहे. सीपीकडे आयोजित केलेल्या बैठकीमध्ये मी स्वत: हजर होतो. श्री.वानखेडे यांच्या वॉर्डात स्वत:बकोरीया यांनी अनाधिकृत बांधकाम पाहिले हा विषय गंभीर आहे. आयुक्तांनी काय कारवाई केली? खुलासा करावा.

प्र.आयुक्त :माहिती अधिकार बाबत मा.आयुक्त यानी एक परिपत्रक काढुन वारंवार माहिती अधिकार मार्फत माहीती मागत असलेल्यांची यादी सर्व विभागांकडुन मागविलेली आहे व त्यांच्यांवर गुन्हे दाखल करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. टॉवर्स बाबत सर्वे चालु आहे. तसेच टॉवरला आग लागलेली आहे त्याठिकाणी तात्काळ पाहणी करून संबधीत अधिकारी यांनी अहवाल सादर करावा.

श्री.सुरे सिताराम :अनाधिकृत बांधकाम आहे, चार चार नळे आहेत. हातगाड्याचे हफ्ते घेतात.

प्र.आयुक्त :अतिक्रमण कार्यवाही मोठया प्रमाणात राबविण्यात यावी,

श्रीमती मुंढे :मी दोन महिन्यापासून परेशान होती. नाल्यावर घरे नाल्याच्या बाजुला घरे बांधण्यात आले आहे. आजच पाणी काढण्यात येईल.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

वार्ड अभियंता (श्री.संधा) :प्रशासकीय विभागाला नाल्यामधील व नाल्याच्या बाजुला असलेले घरे काढण्या बाबत पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे.

श्री.सिकंदर अली :प्रथम अतिक्रमण काढावे लागेल.

मा.सभापती :सध्या पाणी काढण्यासाठी काय करणार?

श्री.सिकंदर अली :नाल्यामधील अतिक्रमण काढावे लागणार आहे तसेच नाल्यामधील पाण्याच्या फ्लोमधील दोन घरे काढावे लागणार आहे. याबाबत प्रशासकीय विभागास पत्र दिलेले आहे.

| | |
|---|---|
| श्रीमती किर्ती शिंदे | :जिल्हा परिषद मैदान वरील गणपती विसर्जन विहीरीची रुंदी व खोली वाढविण्यात यावी. कोणत्याही अधिकात्याने त्याची दखल घेतली नाही. त्या विहीर जवळ कचरा डेपो तयार झाला आहे. तेथील रहिवासीयांना त्यांच्या खुप त्रास होत आहे. |
| मा.सभापती | :शहराच्या प्रश्न आहे. त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. |
| श्री.कमलाकर जगताप | :मुकूंदवाडी येथील दुर्घटना होऊन बरेच दिवस झाले काम सूरू झाले नाही. |
| शहर अभियंता | :स.जगताप यांनी उपस्थित केलेल्या मुद्यानुसार हॉटेल ऐलोरा ते मुकूंदवाडी मंदिरापर्यंत व्हाईट टॉपींग चे काम निधी कमी पडत आहे. 100% काम होणार आहे. जे.पी.इंटरप्रायजेस यांनी पत्र दिले होते की, मला बिल वेळेवर मिळत नाही. फन्डस प्रोब्लेम असल्यामुळे 1 ते 2 महिन्यात हे काम करु 15 दिवसात सदरील काम पूर्ण करण्यात येईल. |
| श्रीमती शेख समिना | :मी लेखा विभागाला पत्र दिले. मला अद्याप माहिती देण्यात आली नाही. |
| मुख्यलेखाधिकारी | :माहिती संकलीत करण्याचे काम सुरु आहे. तयार होताच श्रीमती शेख समिना यांना देण्यात येईल. |
| श्रीमती किर्ती शिंदे | :सी.टी.एस.नं.2640 यावर खुप मोठे कमरशीयल कॉम्प्लेक्स बांधणे चालु आहे. संचिका सापडत नाही. |
| श्रीमती शेख समिना | :शासनाकडील निधी बाबत पत्र दिले आहे. मला उत्तर अद्याप प्राप्त नाही. |
| मुलेअ श्री.संजय पवार | :4-5 दिवसात उत्तर लेखी स्वरुपात देण्यात येईल. |
| श्री.सुरे सिताराम | :चहापाणी का बंद करण्यात आली? कोणी बंद केला? याचा खुलासा व्हावा. |

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद